# बृहन्मुंबई महानगरपालिका
## देवनार पशुवधगृह
## जाहिरात

**महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील नव्याने स्थापन होणा-या पशुवैद्यकीय आरोग्य खात्याकरिता `पशुवैद्यकीय अधिकारी` या संवर्गाची पाच पदे कंत्राटी तत्वावर सहा महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता खाली नमुद केलेल्या अर्हता व अटींच्या पुर्तता करणा-या इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवाराने स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता व अटींची पुर्तता करत असून पात्र आहेत.

**पदाचे नाव- पशुवैद्यकीय अधिकारी (कंत्राटी तत्वावर सहा महिन्याच्या/ १७९दिवसांच्या कालावधीसाठी) एकूण पदे – ५**

| पदाचे नाव – 'पशुवैद्यकीय अधिकारी (कंत्राटी पध्दतीने) | **अनुशेषांतर्गत पदे** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अजा | अज | विजा (अ) | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | विमाप्र | इमाव | **अ.दु.घ.** | खुला | एकूण रिक्त पदे |
| एकूण पदे | १ | - | १ | - | - | - | - | १ | १ | ३ | ७ |
| कार्यरत | १ | - | १ | - | - | - | - | - | ० | - | २ |
| रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ | ३ | ५ |

**समांतर आरक्षण**

| समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | २ |
| महिला(३०%) | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| खेळाडू (०५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग(०४%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ( ०१%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण | - | - | - | - | - | - | - | १ | १ | ३ | ५ |

### सर्वसाधारण अटी व शर्ती

- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक/समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रीया अंशतः / पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- महिलांसाठी ३०% प्रमाणे आरक्षित पदे शासन नियमानुसार भरण्यात येतील तथापि एखाद्या प्रवर्गात त्याप्रमाणे महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.
- इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

- मागासवर्गीय प्रवर्गातून अर्ज करु इच्छिणा-या उमेदवाराने अर्जासोबत जात प्रमाणपत्रासहित जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र Walk in Selection च्या दिवशी जोडणे आवश्यक आहे.
- खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांनी खुल्या प्रवर्गाकरीता निश्चित केलेल्या तारखेस Walk in Selection करीता उपस्थित रहावे.
- महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या वर्गातील स्त्री उमेदवारांनी प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर नविनतम प्रमाणपत्र Walk in Selection दिवशी सादर करणे आवश्यक आहे. तसेच या उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.
- **उपरोक्त पदांची कंत्राट तत्वावर नियुक्ती एका वेळी कमाल सहा महिन्यापर्यंत असेल व पुढील आदेश मिळेपर्यंत पुढील कालावधी करिता वेळोवेळी कमाल ६ महिन्यांच्या (१७९ दिवस) कालावधी करीता किमान १दिवसाचा खंड देऊन आवश्यकतेनुसार कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यात येईल.**
- **कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकार न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.**
- **बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियमावलीनुसार ही नेमणुक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास सदर उमेदवार प्राप्त राहणार नाहीत.**
- **त्यांची नियुक्ती पोलीस ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर देण्यात येईल.**
- **नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु. 100/- बॉंड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.**
- **ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी करण्यात येईल.**
- **निवड झालेल्या उमेदवारांमधून ०५ उमेदवारांच्या नेमणूका करुन आणखीन ०५ उमेदवार प्रतिक्षायादी वर ठेवण्यात येतील. एक वर्षाच्या कालावधीत ०५ उमेदवारांपैकी कोणीही सेवा सोडून गेल्यास प्रतिक्षायादीतील उमेदवारांमधून नेमणूका करण्यात येतील.**
- **सदर पदासाठी ५० पेक्षा अधिक पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्ता यादीनुसार केवळ प्रथम २५ पात्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरिता बोलविण्यात येईल.**
- **दिव्यांग पदाची कर्तव्य व जबाबदारी विचारात घेवून आवश्यक शारिरीक पात्रता धारण करणारे दिव्यांग उमेदवार सर्वसाधारण गटातून निवडीकरीता अर्ज करु शकतात व निवडीस पात्र ठरु शकतात.**

**<u>मानधन</u>**

एकूण रू. ६५०००/- प्रति माह

<u>निवडीचे निकष</u>

**विहित अर्हता- उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास**

1) उमेदवार पशुवैद्यक विज्ञान शाखेचा मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधारक असावा.
   उमेदवार राज्य पशुवैद्यक / भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा १९८४ अंतर्गत नोंदणीकृत असावा.
2) कमाल वयोमर्यादा – उमेदवार खुल्या प्रवर्गातील असल्यास कमाल ३८ वर्षे व उमेदवार मागास वर्गीय असल्यास कमाल ४३ वर्षे.
3) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
4) उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी' सोसायटीचे 'सी.सी.सी'किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर', स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी'

किंवा 'जी.ई.सी.टी' चे प्रमाणपत्रधारक असावा. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली 'एमएससीआयआटी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवासमाप्त करण्यात येईल.

**वयोमर्यादा - उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास**

पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय खुल्या प्रवर्गाकरिता कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांवाच्या बाबतीत कमाल ४३ वर्षे असावे.

**निवडीची कार्यपद्धती -**

- Walk-in Selection पध्दतीने पदवी परिक्षेतील गुण विचारात घेऊन उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणांनुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- उमेदवाराने पशुवैदयकीय शास्त्रातील मान्यताप्राप्त विदयापीठातील पदवी एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास दुस-या प्रयत्नासाठी 1 टक्का गुण, तिस-या प्रयत्नासाठी 2 टक्के गुण एकूण गुणामधून वजा केले जातील. तीन पेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराचा पशुवैदयकीय अधिकारी या पदासाठी विचार केला जाणार नाही.
- मौखिक चाचणी / मुलाखत घेण्यात येणार नाही.
- मागासवर्गीय उमेदवार असेल तर त्याला खुल्या किंवा तो ज्या जातीच्या आरक्षणात मोडत असेल अशा एकाच प्रवर्गातुन अर्ज सादर करता येईल.
- खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेल्या उच्च गुणवत्ता धारक मागास प्रवर्गातील उमेदवारांची केवळ खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणूनच निवड केली जाईल.
- उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुल्या प्रवर्गांच्या पदासाठी विचार करण्यात येईल. दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण असल्यास उमेदवाराच्या वयाच्या ज्येष्ठतेला प्राधान्य देण्यात येईल.

**टिपः-** ज्या मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गासाठी निवड होण्याची शक्यता वाटत नसेल त्यांनी ते ज्या प्रवर्गाचे असतील त्या प्रवर्गाच्या भरतीसाठी वेळापत्रकामध्ये विहीत केलेल्या दिवशी सर्व कागदपत्रानिशी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**<u>उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर रहावयाचे वेळापत्रक</u>**

| अ.क्र. | प्रवर्ग | पशुवैद्यकीय शास्त्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी | भरतीच्या ठिकाणी हजर राहण्यासाठी | |
|---|---|---|---|---|
| | | | तारीख | वेळ |
| १ | **खुला प्रवर्ग** | **७० टक्के किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार** | ०७.१०.२०२४ | **सकाळी ११.०० ते दु.१.०० वा.पर्यंत** |
| २ | **सर्व मागास प्रवर्ग** | **५० टक्के किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार** | ०८.१०.२०२४ | **सकाळी ११.०० ते दु.१.०० वा.पर्यंत** |

भरतीसाठी वर नमूद केलेल्या वेळेपर्यंत उपस्थित असलेल्या उमेदवारांना भरतीच्या स्थळाच्या आवारात प्रवेश दिला जाईल. सदर वेळेनंतर उपस्थित होणा-या उमेदवारांना भरती स्थळाच्या आवारात प्रवेश दिला जाणार नाही.

**<u>अर्ज सादर करण्याची पद्धत सर्वसाधारण सूचना</u>**

उमेदवारानी संकेतस्थळावरील जाहिरातील अनुसरून जाहिरातीत नमूद अटी व शर्तीनूसार आपले अर्ज महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह कार्यालयात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर **दि.०७.१०.२०२४** व **दि.०८.१०.२०२४** रोजी सादर करावेत.

**कार्यालयाचा पत्ता**

महाव्यवस्थापक,<br>
देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय,<br>
गोवंडी रेल्वे स्थानकासमोर,<br>
गोवंडी, मुंबई – ४०० ०४३.<br>
दुरध्वनी क्र. २५५६३२८४-८८<br>
फॅक्स नं - २५५१५६९<br>
ई-मेल आयडी - gm.deonar@mcgm.gov.in

- अर्धवट किंवा अपुर्ण भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- विहित वेळेनंतर सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**सही /-**<br>
**(डॉ. कलिमपाशा अ. पठाण)**<br>
**महाव्यवस्थापक**<br>
**देवनार पशुवधगृह**

**सही /-**<br>
**(श्री. किरण दिघावकर)**<br>
**उपआयुक्त (विशेष)**

**सही /-**<br>
**(श्रीम. अश्विनी जोशी)**<br>
**अति. महानगरपालिका आयुक्त (शहर)**

**सही /-**<br>
**(श्री. भुषण गगराणी)**<br>
**मा. महानगरपालिका आयुक्त**